जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -७२४ दिनांक - २६/०९/२०२३**

हडपसर पोलिस स्टेशन पुणे शहर

## मोबाईल चोरी करणा-या परप्रांतीय टोळीस हडपसर तपास पथका कडून अटक.किं.रू १६ लाखाचे ५२ मोबाईल हॅन्डसेट जप्त

पुणे शहरात गणेशोत्सव साजरा होत असून सदर गणेशोत्सव काळात गर्दीचे ठिकाणी मोबाईल चोरी,दागिने चोरी वगैरे अनुचित घटना होवुन नये या बाबत योग्य त्या उपाय योजना करण्याबाबत मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार यांनी सर्व पोलिस अधिकारी यांना सुचना दिल्या आहे.त्या अनुशंगाने हडपसर पोलीस ठाणे हद्दीत भाजी मंडई,गाडीतळ परिसरात नागरिक सामान खरेदी साठी येत असतात.या गर्दीत नागरिकांचे मोबाईल चोरणाऱ्यांना पकडयासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र शेळके यांनी तपास पथक अधिकारी/अंमलदार यांचे पथक तयार केले.**नमुद पथकाने दिनांक २३/०९/२०२३ रोजी २० मोबाईल चोरी करणारी परप्रांतीय टोळी ही अटक केली होती.**

तपास पथक अधिकारी सपोनि विजयकुमार शिंदे,पोउपनिरी अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार असे पोलीस मित्र यांचे सोबत दिनांक २६/०९/२०२३ रोजी गाडीतळ बस स्टॉप,हडपसर भाजी मंडई भागात पेट्रोलींग करीत असताना तपासपथकातील अंमलदार **अजित मदने व कुंडलीक केसकर** यांना गोपनीय माहीती मिळाली की,मोबाईल चोरी करणारे संशयीत हे उन्नती नगर कॅनोल येथे थांबले आहेत.हडपसर तपासपथकाने सापळा रचून आरोपी नामे १) शामकुमार संजय राम वय २५ वर्षे रा.तीनपहाड नया टोला, पंचायत भवन,ठाणा राजमहल जि.सायबगंज राज्य झारखंड २) विशालकुमार गंगा महातो वय २१ वर्षे रा. तीनपहाड बाबुपुर,जि.सायबगंज राज्य झारखंड ३) बादलकुमार मोतीलाल महातो वय २५ वर्षे रा. महाराजपुर, नया टोला, जि.सायबगंज राज्य झारखंड ४) विकीकुमार गंगा महातो ऊर्फ बादशाह नोनीया वय १९ वर्षे रा.बाबुपुर तिनपहाड,जि.सायबगंज राज्य झारखंड यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे अधिक तपास करता **त्यांचे ताब्यात १२ मोबाईल हॅन्डसेट हे मिळून आले आहे.** तसेच दोन साथीदार पाहीजे आरोपी आहे.

त्यानंतर त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता सदर आरोपींनी मोबाईल चोरीचा पूर्व नियोजीत कट करून झारखंड येथून पुणे शहर परीसरात येवून मंडई परीसर,चित्रा चौक भाजी मंडई, व पुणे शहरातील विविध ठिकाणी हातचालाखी करून मोबाइल चोरी केली असल्याची कबुली दिली,त्यानंतर त्यांचे घरझडती घेतली असता **त्यांचे घरातून ४० मोबाईल हॅप्न्डसेट जप्त करण्यात आले आहेत.**

पुणे शहरात गणेशोत्सवा दरम्यान गर्दी अधिक असते व त्यादरम्यान मोबाईल चोरी करण्याकरीता ते १२ सप्टेंबर रोजी तीनपहाड स्टेशन येथे एकत्र भेटले व त्यानंतर हाटीया एक्सप्रेसने पुणे येथे आले. त्यानंतर त्यांनी पुणे शहरात हडपसर,येरवडा,विश्रामबाग,फरासखाना,बंडगार्डन,स्वारगेट,फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीत व इतर ठिकाणी गर्दीचा फायदा घेवून मोबाईल चोरी केले असल्याचे सांगीतले.

आरोपींची प्राथमिक माहीती घेतली असता आरोपी नामे ४) विकीकुमार गंगा महातो ऊर्फ बादशाह नोनीया वय १९ वर्षे रा.बाबुपुर तिनपहाड,जि.सायबगंज राज्य झारखंड याचेवर तिनपहाड थाना जि.पहाडगंज अनुमंडल राजमहल येथे ५५/२०२३ भा.दं.वि.३७६(D)(A) प्रमाणे सामुहीक बलात्काराचा गुन्हा दाखल असून दाखल गुन्ह्यामध्ये तो पाहीजे आरोपी आहे.तसेच आरोपी २) विशालकुमार गंगा महातो वय २१ वर्षे रा. तीनपहाड बाबुपुर,जि.सायबगंज राज्य झारखंड याचे विरूध्द झारखंड येथे मोबाईल चोरीचे ३ गुन्हे दाखल आहेत.

**हडपसर तपास पथकाने आरोपींकडून आज रोजी पर्यंत हडपसर पोलीस ठाणेकडील ०४ गुन्हे उघडकीस केले आहेत.आरोपींकडून किं.रू १६ लाख रू किं.चे ५२ मोबाईल हॅन्डसेट जप्त करण्यात आले आहेत.मागिल दोन दिवसामध्ये हडपसर पोलीसांनी ७२ मोबाईल हॅन्डसेट हे जप्त करून परप्रांतिय ०९ आरोपी यांना अटक केली आहे.**

नमुद आरोपी विरुध्द हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं.१४५९/२०२३ भा.दं.वि.कलम ३७९,३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन त्यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात अली आहे.गुन्ह्याचा पुढील तपास मनोज सकट पोलीस हवालदार हडपसर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे श्री.रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ श्री.विक्रांत देशमुख मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे, श्रीमती अश्विनी राख, यांचे मागदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर, श्री.रविंद्र शेळके, पोनि.(गुन्हे) श्री.विश्वास डगळे,श्री.संदीप शिवले यांचे सुचना प्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार,सुशील लोणकर,संदीप राठोड,समीर पांडुळे,सचिन जाधव,शाहीद शेख,प्रशांत दुधाळ,निखील पवार,अतुल पंधरकर, भगवान हंबर्डे,अनिरूध्द सोनवणे,सचिन गोरखे,प्रशांत टोणपे,अजित मदने,चंद्रकांत रेजीतवाड,मनोज सुरवसे, अमोल दणके,कुंडलीक केसकर,रशिद शेख,पोलीस मित्र अविनाश ढगे,शुभम खाडे,कावेरी फाळके,पुनम काळे,प्रतिक माने यांचे पथकाने केली आहे.

